# महाराष्ट्र सावकारी (नियमन ) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये आदेश

3781
जा.क्र.जिउनि/सावकारी/अवैद्य.क.१८ /२०१४
कार्यालयः-जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,
औरंगाबाद दि.०१.१२.२०१४.

**वाचा:-**१.श्री.किशोर शेषराव मगर रा.नावडी यांचा तक्रारअर्ज दि.२३/९/२०१३ जो मुळतःमा.श्री.आर.आर.पाटील तत्कालीन गृहमंत्री महाराष्ट्र राज्य यांना उद्येशुन देण्यात आलेला असुन सदर अर्जाचाी प्रत पृष्ठांकित केलेली आहे. व त्यांनी दिनांक १२/११/२०१४ अन्वये सादर केलेले लेखी म्हणणे

२. या कार्यालयाचे पत्र दि. ३०/९/२०१३.

३. सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.कन्नड यांचा चौकशी अहवाल दिनांक १८/१२/२०१

४.या कार्यालयाची महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ नोटीस दि. ७/८/२०१४ ६/९/२०१४,१२/९/२०१४.१७/११/१४.

५. सौ.रुख्मिनीबाई लक्ष्मण कांबळे यांनी त्यांचे वकील ॲड.कृ.उ.निकम यांचे मार्फत सादर केलेले लेखी म्हणणे दिनांक २०/१०/१४ व दिनांक २४/११/२०१४ अन्वये सादर लेखी म्हणणे व युक्तीवाद.

६.श्रीमती.सुरजाबाई पुनमचंद अग्रवाल यांचा लेखी जबाब दि.२४/११/२०१४ अन्वये श्री पुनमचंद अग्रवाल यांचे मार्फत

श्री.किशोर शेषराव मगर
रा.मु.नावडी ता.कन्नड जि.औरंगाबाद. — अर्जदार

**विरुध्द**

१. सौ.सुरजाबाई पुनमचंद अग्रवाल
ता.कन्नड जि.औरंगाबाद. — गैरअर्जदार

२. सौ.रुख्मिनीबाई लक्ष्मण कांबळे
रा.अंधानेर ता.कन्नड जि.औरंगाबाद

३.सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,कन्नड
तथा प्राधकृत अधिकारी.

ज्याअर्थी, वाचा क्र.१ अन्वये श्री. किशोर शेषराव मगर रा.नावडी ता.कन्नड जि.औरंगाबाद यांनी दिनांक २३/९/२०१३ चा अर्ज जो मुळतःमा.श्री.आर.आर.पाटील तत्कालीन गृहमंत्री महाराष्ट्र राज्य मुबंई यांना देण्यात आला असुन त्यांची प्रत या कार्यालयास पृष्ठांकित करण्यात आली आहे.सदर तक्रारी अर्जात श्री.मगर यांनी

सावकार व त्याच्यात झालेल्या व्यवहाराची माहिती सविस्तर नमुद केली आहे.त्याचा तपशिल थोडक्यात पुढील प्रमाणे आहे.

श्री.किशोर शेषराव मगर यांनी तक्रारी मध्ये नमुद केल्यानुसार **१** तक्रारदार यांचे वडीलांनी श्री.पुनमचंद अग्रवाल यांचे कडुन घेतलेल्या कर्जाच्या मोबदल्यात त्यांच्या वडीलांकडुन मौजे रेल येथिल गट क्र.२२६ मधील २ हेक्टर ७४ आर जमीनीचे शर्ती खरेदीखत दि.१/३/१९८९ रोजी सौ.सुरजाबाई पुनमचंद अग्रवाल यांचे नावांने करुन घेतली .श्री.पुनमचंद अग्रवाल यांच्या खाजगी सावकारी कर्जाची परतफेड केलेली असतांनाही जमीन ही व्याजाच्या पैश्यामध्ये शर्त खरेदीखत करुन घेतली आहे.सावकाराचे कर्ज व व्याज पुर्णपणे निल केलेले असतांनाही सावकाराने वडीलांच्या भोळया स्वभावाचा गैरफायदा घेऊन जास्तीची रक्कम वसुल करुन जमीन हाडप करुन सावकारी व्यवहाराची रक्कम अद्यापपर्यंत वसुल करीत आहे.

२) सदर तक्रारीमध्ये नमुद आहे की, मौजे रेल शिवारातील गट नं.२२६ मधील १ हे ६० आर जमीन श्री.लक्ष्मण कांबळे यांच्याकडुन रु.४% व्याजाने रक्कम घेवुन त्यांची पत्नी नामे सौ.रुख्मीनीबाई लक्ष्मण कांबळे यांना दिनांक २/४/१९९२ मध्ये तक्रारदाराचे आईने शर्त खरेदीखत करुन दिले. श्री.कांबळे यांनी मुदतीत पैसे न दिल्यास जमीन दुस-याला विक्री करण्याची धमकी दिली त्यावरुन सदरची जमीन श्री.तुकाराम किसन जाधव यांना विक्री केली व श्री कांबळे यांच्या रक्कमेची परतफेड केली.

३) दि. १४.१२.१९९२ रोजी श्री. बाबू मांगू चव्हाण रा. कन्नड यांना सावकारीत अट म्हणून ०.८१ आर शेतजमीन व विहिरीत ४ आणे हिस्सा या प्रमाणे रु.१७,०००/- मध्ये लिहून दिली होती. परंतु श्री. चव्हाण यांनी नियतीत बदल करुन जमीन हडप केली.

४) दि.२८.२.१९९४ रोजी श्री. शिवाजी किसन जाधव यांना रेल शिवारातील गट नं.२२६ मधील ४० आर जमीन व विहिरीत ४ आणे हिस्सा या प्रमाणे विक्री केली. भुविकास बँकेच्या २ हप्त्यांचे कर्जाची कपात श्री. शिवजी किसन जाधव यांना करुन देवून उरलेले श्री. अग्रवाल यांना पैसे दिले. दि.२८.२.१९९४ ला श्री. शिवाजी किसन जाधव यांचे नाव गाव नमुना ७/१२ नसतांना सावकाराचा दबाव आणून सावकाराशी संगनमत करुन उत्तर बाजुची चतु:सिमा श्री. जाधव यांच्या नावाने दाखवून घेतली.

तक्रारीत पुढे नमुद आहे की, त्यानंतर सन १९९७ मध्ये गैरअर्जदार क्र.१ सौ.सुरजाबाई पुनमचंद अग्रवाल यांचे वतीने श्री. पुनमचंद अग्रवाल यांनी पैश्याची मागणी करुन सांगीतले की, १ एकर जमीन ठेवून बाकीची परत करतो, परंतु रु. ५०,०००/- दे, व राहिलेली १ एकर जमीन सदरील जमीनीवर घेतलेले सोसायटीचे कर्ज भरुन देवून तीही तुला परत करेल. तेंव्हा मी नाईलाजाने श्री. भास्कर किसन जाधव यांना ४० आर जमीन विक्री करुन श्री. पुनमचंद अग्रवाल यांच्याकडून २ हे.३४ आर जमीन वापस घेतली आहे.

सन १९९७ मध्ये भुविकास बँकेच्या अंगूर वेलीच्या कर्जाची परतफेड , ट्रॅक्टरसाठी डाऊन पेमेंट, शेअर्स व भरण्यासाठी ५३ आर जमीन श्री. भास्कर किसन जाधव यांना विक्री केली.व विहिरीतील पाण्याच्या पाळीवरुन श्री.जाधव बंधू यांनी वाद करुन मानसिक छळ करुन त्रास देत होते. बँकेचा हप्त्याचा तगादा या त्रासाला कंटाळून जानेवारी २००० मध्ये विहिरीतील राहिलेला हिस्सा व भोवतालची ११ आर जमीन श्री. जाधव यांना विक्री करुन आलेली रक्कम बँकेकडे भरली सन २००२ मध्ये ट्रॅक्टर दुरुस्तीसाठी व बँकेचा हप्ता भरण्यासाठी प्रा. श्री. रावसाहेब नागरे यांचे कडून ४% व्याजाने रु.५०,०००/- देण्याचे बोलीवर २ एकर जमीनीचे खरेदी खत करुन दिले. श्री. नागरे यांनी रु.२५,०००/- दिले व राहिलेले पैसे १५ दिवसांनी देण्याचे ठरले. परंतु १५ दिवसांनी श्री.

नागरे यांनी आणखी २ एकर जमीनीचे खरेदीखत करुन देण्याची मागणी केली. श्री. नागरे यांना मुद्दल रु.२५,०००/- चे आडीच लाखाच्या वर रक्कम दिली. परंतु जमीन परत करण्यास ते टाळाटाळ करीत आहे.उपरोक्त प्रमाणे तक्रारीमध्ये नमुद आहे.

सदरील तक्रार वाचा क्र.२ अन्वये सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था कन्नड यांना चौकशीसाठी देण्यात आली.व त्यांनी त्यांचे कार्यलयातील सहकार अधिकारी श्रेणी-१ यांना चौकशी साठी प्राधिकृत करण्यात आले.त्यानुसार चौकशी अधिकारी यांनी गैरअर्जदार सौ.सुरजाबाई पुनमचंद अग्रवाल रा.कन्नड,सौ.रुख्मीनीबाई लक्ष्मण कांबळे रा.अंधानेर,तसेच श्री.भास्कर किसन जाधव श्री.तुकाराम किसन जाधव व श्री.कल्याण शिवाजी जाधव रा.नावडी यांचे रहाते घरी दिनांक २७/३/२०१४ रोजी घरझडती तपासणी घेतल्या त्यांबधीचा संदर्भ क्र.१ च्या तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल/अभिप्राय वाचा क्र.३ अन्वये सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी या कार्यालयास सादर केला.सदरील अहवालाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

अर्जदार श्री. किशोर शेषराव मगर यांची आई नामे रमनबाई शेषराव मगर यांचेकडून गैरअर्जदार क्र.१ श्री. पुनमचंद जगनलाल अग्रवाल यांनी त्यांची पत्नी नामे सौ. सुरजबाई पुनमचंद अग्रवाल यांचे नावाने रेल शिवारातील गट नं.२२६ मधील २ हेक्टर ७४ आर जमीन शर्ती खरेदी (गहाण स्वरुपी) दि.१.३.१९८९ रोजी रु. ४००००/- घेतली आहे. व सदर जमीनी पैकी २ हे ३४ आर जमीन तक्रारदार यांची आई रमनबाई मयत झाल्यानंतर तक्रारदार श्री. किशोर मगर यांना दि.५.४.१९९७ रोजी परत विक्री केलेली आहे. तसेच आजही ०.४० आर जमीन सौ.सुरजबाई पुनमचंद अग्रवाल यांचे नावाने असल्याचे दिसते.

गैरअर्जदार क्र.१ यांचे घरझडतीचे पंचनाम्यातील बाब क्र. २४ वर औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा-हतनूर येथील खाते क्र.४२/२ वरील रु.६०००/- चा नाव नसलेला व तारीख नसलेला धनादेश मिळून आलेला आहे.

गैरअर्जदार क्र.१ यांचे घरझडती पंचनाम्यातील बाब क्र.२५ वर कच्च्या हाताने लिहीलेल्या चिठ्या मिळाल्या असून त्यातील बाब क्र.२५/१ मध्ये कर्ज खाते श्री. अ. समद अ. रशिद मु. २१३४१७ व्याज २५४८५ असे एकूण २३८९०२ दि.२५.२.२०१४ अखेर असा मचकुर असलेली चिठ्ठी मिळाली आहे. सदर चिठ्ठीवर संबंधितांचा पुर्ण पत्ता नसल्यामुळे चिठ्ठीबाबत शहानिशा करता आली नाही.

गैरअर्जदार क्र.१ यांचे घरझडती पंचनाम्यातील बाब क्र.२५वर कच्च्या हाताने लिहीलेल्या चिठ्या मिळाल्या असून त्यातील बाब क्र.२५/२ मध्ये श्री. सुरेश मोतीलाल पाटोदी १७३/८० मुद्दल ४०१४९ व्याज ३१७२१ एकुण ७१८७० दि.२१.२.२०१४ अखेर असा मचकुर असेली चिठ्ठी मिळाली आहे. सदर चिठ्ठीवर संबंधितांचा पुर्ण पत्ता नसल्यामुळे चिठ्ठीबाबत शहानिशा करता आली नाही.

गैअर्जदार क्र.२ सौ. रुख्मीनीबाई लक्ष्मण कांबळे यांचे नावाने तक्रारदार यांची आई सौ. रमनाबाई मगर यांची रेल शिवारातील गट नं.२२६ मधील १ हेक्टर ६० आर जमीन दि.२.४.१९९२ रोजी शर्ती खरेदी खत गहाण स्वरुपी रु.५००००/- चे करुन घेतलेले आहे. व दि.१.१०.१९९२ रोजी तक्रारदार यांची आई रमनाबाई मयत झाल्यानंतर त्यांचे वारस तक्रारदार श्री. किशोर शेषराव मगर व इतर यांना खरेदीखताने परत केली आहे.

अर्जदार श्री किशोर शेषराव मगर यांना गैरअर्जदार श्री. रावसाहेब सखाहारी नागरे रा. शिवराई व श्री. नारायण भागाजी मुट्ठे रा. शिवराई, श्री. बाळू मांगू चव्हाण यांचा वास्तव्याचा पत्ता लेखी स्वरुपात विचारला असता तक्रारदार यांनी गैरअर्जदार श्री. रावसाहेब सखाहारी नागरे रा. शिवराई व श्री. नारायण भागाजी मुट्ठे रा. शिवराई हे मयत झाले असले बाबत व श्री बाळु(बाबु )मांगु चव्हाण यांचे बाबत मला काहीही माहित नसल्याचे समक्ष येवून तोंडी कळविलेले आहे.

सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था कन्नड यांनी अहवालात नमुद केले आहे की,एकंदर चौकशीमध्ये गैरअर्जदार क्र.१ श्री. पुनमचंद जगनलाल अग्रवाल रा. टिळकनगर, रा. कन्नड व गैरअर्जदार क्र.२ श्री. लक्ष्मण सावळीराम कांबळे रा. अंधानेर हे कुटुंबीयासह संगनमताने बेकायदेशीर सावकारीचा व्यवसाय करतात. व्याजाने दिलेल्या रक्कमेला तारण म्हणून ज्या इसमास रक्कम देतात त्याची जमीन आपले पत्नीचे नावाने शर्ती खरेदीखत (गहाण स्वरुपी) रजिस्ट्री करुन घेतात. ज्याचेकडून रजिस्ट्री करुन घेतली आहे त्याने व्याजासह रक्कम परत केल्यावर त्याचे नावाने रजिस्ट्री पलटून दिल्या आहेत.असे चौकशीमध्ये अभिप्राय नमुद केले आहेत.

गैरअर्जदार क्र.१ श्री. पुनमचंद जगनलाल अग्रवाल, रा. टिळकनगर, कन्नड व गैरअर्जदार क्र.२ श्री. लक्ष्मण सावळीराम कांबळे, रा. अंधानेर, ता. कन्नड हे बिना परवाना बेकायदेशीर सावकारी व्यवहार करीत असल्याचे चौकशी अहवालात नमुद असल्यामुळे त्यांचे विरुध्द महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत कायदेशीर कार्यवाही होणे गरजेचे असले बाबत अहवालात नमुद आहे, आणि

ज्याअर्थी,वाचा क्र.३ अन्वये सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था ता.कन्नड यांचे कडुन प्राप्त झालेला चौकशी अहवाल व अभिप्राय विचारात घेता या कार्यालयाने वाचा क्र.४ अन्वये महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ कलम ३९ चे उल्लघन केले म्हणुन गैरअर्जदार क्र.१ व २ यांना उक्त कायद्यातील कलम ४८ अन्वये सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था कन्नड यांना या कार्यालया मार्फत कार्यवाही करण्या बाबत अधिकार पत्र का देण्यात येऊ नये म्हणुन आपले लेखी /तोंडी म्हणणे मांडण्यासाठी दिनांक १९/८/२०१४ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सुनावणीच्या दिवशी अर्जदार व गैरअर्जदार १ व २ यांना सुनावणीच्या नोटीस तामील न झाल्याचे निदर्शनास आल्या मुळे सदर सुनावणी दिनांक २७/८/२०१४ रोजी ठेवण्यात आली.व त्यानंतर प्रस्तुत प्रकरणी या कार्यालयात दिनांक २७/८/०१४,१६/९/०१४,२३/९/०१४,७/१०/१४,२०/१०/०१४,११/११/१४,१५/११/१४,२४/११/०१४ रोजी सुनावणी घेण्यात आली, आणि

ज्याअर्थी, दिनांक २०/१०/२०१४ च्या सुनावणीस अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ च्या वतीने त्यांचे पती श्री.पुनमचंद जगनलाल व २ चे वतीने त्यांचे पती श्री.लक्ष्मण सावळाराम कांबळे हजर होते तसेच. गैरअर्जदार क्र.२ च्या वतीने ॲड श्री.निकम यांनी वाचा क्र.५ अन्वये लेखी म्हणणे सादर करुन नमुद केले की, अर्जदाराने केलेली तक्रार खोटी, खोडसाळपणाची व चुकीची आहे.ती गैरअर्जदार क्र.२ यांना मान्य व कबुल नाही. व अर्जदाराने दाखल केलेली तक्रार ही १९९२ सालाच्या व्यवहारासंबंधी आहे,व्यवहार संपल्यावर सुमारे २० वर्षानंतर दाखल केलेली तक्रार मुदतबाहय असल्याने त्वरीत फेटाळण्यास योग्य आहे, गैरअर्जदाराने अर्जदाराशी कधीही कुठलाही व्यवहार केलेला नसल्याने या गैरअर्जदाराविरूध्द सदरची तक्रार चालु शकत नाही,अर्जदाराने तक्रार अर्जात त्यांचे आईचे मृत्युबाबत केलेले आरोप खोटे आहेत,अर्जदाराने त्यांच्या आईच्या मृत्युबाबत केलेल्या विधानाच्या पुष्टयार्थ कागदपत्रे जोडणे आवश्यक होते,जे जोडले नाही.

अर्जदार श्री.किशोर शेषराव मगर हे दिनांक ११/११/२०१४ रोजी हजर राहुन सुनावणी दरम्यान असे म्हणणे मांडले की, गैरअर्जदार क्र.१ व २ यांना अनुक्रमे १९८९ व १९९२ वर्षी सदरची जमीन सावकारी व्यवहारापोटी खरेदी खताने करुन दिलेली आहे तसेच गैरअर्जदार क्र.१ यांना २ हे ७४ आर जमीन विक्री केलेल्या पैकी २ हे.३४ आर मला (श्री.किशोर शेषराव मगर) विक्री खताव्दारे दि.५.४.१९९७ परत केली आहे. तसेच श्री.रावसाहेब सकाहारी नांगरे (मयत) यांना विक्री केलेली जमीनीचा फेर त्यांच्या वारसाच्या नांवे झालेला नाही व ती जमीन माझ्याच ताब्यात आहे.तसेच गैरअर्जदार क्र.१ यांचे नावे असलेली १ एकर जमीनीवर अद्यापही माझाच ताबा आहे.सदर जमीन मला परत करण्यात यावी.व गैरअर्जदार क्र.२ सौ.रुख्मीनबाई लक्ष्मणराव कांबळे यांच्याकडे जमीन बाकी नाही, त्यांनी जमीन पुर्वीच खरेदीखताव्दारे परत केली आहे. सदर जमीन खरेदी विक्री सावकारी व्यवहार हा भुविकास बँकेचे कर्ज व ट्रॅक्टर दुरुस्ती साठी केलेला आहे.

गैरअर्जदार क्र. १ यांचे वतीने दि.११/११/२०१४ चे सुनावणी दरम्यान चौकशी अहवालाची प्रत मिळणे बाबत विनंती केली व लेखी म्हणणे २ दिवसात सादर करतो असे सांगितले.तसेच गैरअर्जदार क्र.२ वतीने अॅड.श्री.निकम यांनी नमुद केले की,लेखी युक्तीवाद सादर करणेसाठी वेळ देण्यात यावा असी विनंती केली.

तसेच अर्जदार यांनी वाचा क्र.१ अन्वये लेखी तक्रारीवर दिनांक २४/११/२०१४ च्या सुनावणीस हजर राहुन प्रतिपादन केले की,श्रीमती अग्रवाल यांचे कडे असलेली १ एकर जमीन आमच्या कुटुंबाच्या ताब्यात असुन सदर जमीन माझ्या मयत आई यांचे कायदेशिर वारसाना परत करण्याचा हुकुम होणेसाठी मी कायदेशिर वारसा हक्काचे प्रमाणपत्र सादर करीन.व त्यानंतर माझा सावकारी तक्रारी अनुषंगाने तक्रार /उजर राहाणार नाही.

ज्याअर्थी,गैरअर्जदार क्र.२ च्या वतीने अॅड.श्री.निकम यांनी दिनांक २४/११/२०१४ च्या सुनावणीच्या दरम्यान सादर केलातो लेखी म्हणणे व युक्तीवाद केला की, आमचे खरेदी खत सन १९९२ चे आहे.प्रस्तुत प्रकरणामध्ये गैरअर्जदार क्र.२ सौ.रुख्मीनीबाई लक्ष्मण कांबळे यांनी अनेक व्यक्तीशी सावकारी केल्या बाबत चौकशी अहवालात नमुद बाबत पुरावा नाही.सबब सदर प्रकरण मुदत बाहय आहे.तसेच सदर व्यवहार हा अर्जदाराच्या आईसोबत झालेला आहे व त्या मयत आहेत.तसेच सदर जमीन तक्रारदार यांना पुर्वीच परत केली आहे.तसेच अपवादात्मक व्यवहार हा सावकारी कायद्याखाली येत नाही असे मा.उच्य न्यायालयाचे दोन न्याय निवाडे १९९९ (१) Mh.L.J., २०११ Mh.L.J. सादर केले व त्यांच्या विरुध्द सावकारी कायद्याखालचे प्रकरण थांबवण्यात यावे व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कन्नड यांचा चौकशी अहवाल त्यांच्या हद्यी पुरता नाकारावा, असी विनंती केली.

ज्याअर्थी,गैरअर्जदार वाचा क्र.६ च्या वतीने त्यांचे पती श्री.पुनमचंद अग्रवाल यांनी लेखी युक्तीवाद सादर करुन तोंडी म्हणणे मांडले की,अर्जदार श्री.किशोर शेषराव मगर यांनी दिलेली तक्रार खोटी असुन सदर व्यवहार हा अर्जदार यांचे आईसोबत २५ वर्षापुर्वी झालेला आहे.व सदर व्यवहार हा मुदतबाहय असल्यामुळे सावकारी कायद्याखाली येत नाही.घर झडती मध्ये सापडलेले कागदपत्र त्यांचे कुटुबियांचे शेअर्स, प्रमाणपत्र,बँकेचे कागदपत्र आहेत.तसेच अहमद समद ,सुरेश मोतीलाल पाटोदी हे वैजापुर मर्चंट बॅंकेचे कर्जदार असुन कागदावर लिहिलेला हिशोब हा बँकेचा असुन त्याच्याशी त्यांचा संबंध नाही. गैरअर्जदाराचे पती श्री.पुनमचंद अग्रवाल हे वैजापुर मर्चंट बॅंकेचे संचालक असल्यामुळे बॅंकेमार्फत कर्जदारांना कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी कर्जाचा हिशोबासाठी त्यांचे

पतीकडे दिलेले कागदपत्र कर्जदारांचे कागदपत्राच्या जादा प्रती बॅकेच्या कर्जदारांकडुन तशाच त्यांच्या घरात राहिल्यामुळे ते कागदपत्र सावकारीच्या घरझडती मध्ये प्राधिकृत अधिकारी यांनी हस्तगत केलेले आहे. त्यामुळे सदर कागदपत्राचा तक्रारदार श्री.किशोर शेषराव मगर यांनी दिलेल्या सावकारी तक्रारीबाबतच्या अर्जाशी काही संबंध नाही.तसेच ते कोणत्याही प्रकारचा सावकारी व्यवसाय करीत नसुन कोणत्याही सावकारीचे व्यवहारामध्ये जमीनीचे खरेदीखत केलेले नाही. तसेच अर्जदाराचे आईस जमीन खरेदीवेळी असलेल्या बाजार भावाप्रमाणे जमीनीचा मोबदला देवुन कायदेशिर नोंदणी खरेदीखत करुन घेतलेले आहे.तसेच तक्रारदार केवळ जमीनीचे भाव वाढलेमुळे नवीन कायद्याचा गैर फायदा घेण्याच्या दुषीत हेतुने आपले कार्यालयाकडे दडपण आणण्याचा प्रयत्न करीत आहे.अर्जदाराचे आईचे खरेदी विक्री व्यवहाराशी आर्जदाराने सावकारी व्यवहार होता म्हणनेचे तक्रारीशी त्यांचा काही संबंध नाही. त्यांचे घरी सापडलेले कागदपत्रातील व्याजाचे नोंदीबाबत संबंधीताचे म्हणने न घेता चौकशी अधिकारी यांनी संबंध जोडणे चुकीचे व त्यांच्यावर अन्याय करणारे आहे.तरी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कन्नड यांचा चौकशी अहवाल ग्राहय धरुन त्यांचे विरुध्द कार्यवाही करु नये कारण अहवाल एकतर्फी संबंधीतांचे म्हणने न घेता सादर केलेला आहे.तसेच तक्रारदार श्री किशोर शेषराव मगर व्यतीरिक्त त्यांचे व्यवहाराबाबत कुणीही सावकारी संबंधाने तक्रार केलेली नाही. व सावकारीही केलेली नाही म्हणुन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कन्नड यांचा अहवाल त्यांचे हद्दीपुरता फेटाळावा व त्यांना निर्दोष करावे अशी विनंती केली.

अर्जदार, श्री.किशोर शेषराव मगर रा.नावडी ता.कन्नड यांनी तक्रारीत नमुद केलेल्या बाबी व त्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था कन्नड यांनी केलेली चौकशी ,व चौकशी अंती सादर केलेला चौकशी अहवाल व अभिप्राय, गैरअर्जदार क्र.१ च्या वतीने सादर केलेला खुलासा व सुनावणी दरम्यान मांडलेले तोंडी म्हणणे,व गैरअर्जदार क.२ यांनी त्यांच्या अभियोकत्या मार्फत सूनावणी दरम्यान सादर केलेले लेखी म्हणणे,केलेला युक्तीवाद, व अर्जदाराचा उर्वरीत ४० आर जमीनीचा प्रत्यक्ष ताबा इत्यादी विचारात घेता पुढील बाबी निदर्शनास येतात

**१)** गैरअर्जदार क्र.१ यांच्या घराच्या घरझडती मध्ये सापडलेले कर्ज व व्याजाची चिठ्ठी बाबत संबंधीताची नांवे व पुर्ण पत्ता नसल्यामुळे चौकशी अधिकारी यांना संबंधीत व्यक्तीकडे सावकारी व्यवहारा बाबत शाहानिशा करता आली नाही. त्यांचेकडील घरझडतीत सापडलेले चिठ्ठीवर असलेले नांवे श्री.अ.समद अ.रशिद व श्री.सुरेश मोतीलाल पाटोदी यांच्या चिठ्ठीतील व्याजा बाबत सदर दोन्हीही व्यक्तीचे व्यवहारा संबंधाने पत्ता नसल्यामुळे त्यांचे म्हणणे चौकशी अधिकारी यांनी घेतलेले नाही त्यामुळे त्यांचे सोबत गैरअर्जदार क्र.१ यांचा व्यवहार सावकारीचा असलेबाबत स्पष्ट होत नाही.त्यामुळे गैरअर्जदार यांचे म्हणणे की,त्यांचे पती वैजापुर मर्चंट बँकेचे संचालक असल्यामुळे बँकेच्या कर्जाच्या हिशोबा करिता सदर कागदपत्र दिले बाबत म्हणण्यास पुष्ठी मिळते.

**२)** गैरअर्जदार क्र.१ यांनी तक्रारदार श्री.किशोर शेषराव मगर यांची आई रमनबाई शेषराव मगर यांचे कडुन मौजे रेल शिवारातील गट.क्र.२२६ मधील २ हे.७४ आर जमीन दि.१.३.१९८९ रोजी खरेदीने घेतलेली आहे.तसेच रमनबाई शेषराव मगर यांच्या मुत्यू नंतर सदर २ हे.७४ आर जमीनीपैकी २ हे.३४ आर जमीन तक्रारदार श्री.किशोर शेषराव मगर यांना दिनांक ५/७/१९९७ रोजी खरेदी खताव्दारे परत केली आहे.आणि शिल्लक ४०

आर जमिनीवर अर्जदारांचा ताबा आहे म्हणुन सदर व्यवहार महाराष्ट्र सावकारी (नियम) अधिनियम २०१४ चे कायदेशिर मर्यादेत आहे.

३) गैरअर्जदार क्र.२ सौ.रुख्मीनीबाई लक्ष्मण कांबळे यांचे नावाने तक्रारदार यांची आई रमनबाई शेषराव मगर यांचे कडुन रेल शिवारातील गट.क्र.२२६ मधील १ हे.६० आर जमीन दि.२/४/१९९२ रोजी शर्तीखरेदी खताव्दारे करुन घेतले होती व दिनांक १/१०/१९९२ रोजी तक्रारदार यांची आई रमनबाई मयत झाल्यावर त्यांचे वारस मुलं श्री.किशोर मगर व इतर यांना खरेदी खताने परत केली आहे.गैरअर्जदार क्र.२ यांचे कडे अर्जदाराची जमीन बाकी नाही.

४) तक्रारीतील नमुद इतर खरेदीदाराचे सविस्तर पत्ते कळविणे बाबत चौकशी अधिकारी यांनी तक्रारदार यांना लेखी कळविले असता तक्रारदार श्री.किशोर शेषराव मगर यांनी चौकशी अधिकारी यांना तोंडी सागीतले की,श्री.रावसाहेब सखाहरी नागरे रा.शिवराई व श्री.नारायण भागाजी मुळे रा.शिवराई हे मयत झालेले आहे.तसेच तक्रारदार यांची आई ज्यानी खरेदीखत करुन दिलेले होते त्याही मयत आहे.आणि जमीनीचा व्यवहार हा सन १९९२ व १९९७ च्या कालावधीतील आहे.तक्रारीमधील नमुद श्री.भास्कर किसन जाधव व श्री.तुकाराम किसन जाधव यांना तक्रारदार श्री.किशोर मगर यांनी सन १९९२ ते २००० दरम्यान जमीन खरेदी खताव्दारे विक्री केलेली आहे.व शिवाजी किसन जाधव यांनी श्री.बाबुराव मांगु चव्हाण यांचेकडुन २८/२/१९९४ रोजी खरेदीखताने जमीन घेतलेली आहे.सदर जमीनी परत झालेल्या किंवा परत विक्री झालेल्या नाहीत.

५) तक्रारीतील नमुद पैकी काही जमीनऔरंगाबाद जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुद्येशीय विकास बँक म.औरंगाबाद शाखा कन्नड कडे दि.१०/१०/१९९७ ला तक्रारदार यांनी तारण ठेवलेली असतांना तदनंतरही सदर तारण जमिनीचे परस्पर विक्री केलेली असुन बॅकेचे कर्ज भरणा बाकी आहे.सुनावणी दरम्यान अर्जदाराचे स्वतंत्र अर्जावर बँकेने त्यांची तारण मालमत्ता परस्पर विक्री व खरेदी बाबतची कार्यवाही व कर्ज वसुली करीता खरीदीदारा विरुध्द कर्ज वसुली साठी डिक्री दावा दाखल करुन कर्ज खरीदीदाराच्या नांवे वर्ग करणे,सदर जमीनीचा फेरफार रद्य करणे बाबत कार्यवाही करणे व बँकेची तारण मालमत्ता परस्पर विक्री संबंधाने कायदेशिर कार्यवाही करणे इत्यादी अनुषंगाने बँकेस सुनावणी दरम्यान अर्जदाराचे स्वतंत्र अर्जावर अलहिदा कळविले आहे.

उपरोक्त जमीन खरेदी विक्री व्यवहार परत त्याच व्यक्तींना जमीन परत करणे यावरुन सदरचे खरेदी व्यवहार सावकारी संदर्भाने जमीन प्रतिभुती होती हे तक्रारदाराचे म्हणण्यास पुष्ठी देणारे आहेत.तथापी गैरअर्जदार अनेक व्यक्ती आणि खरेदी विक्री अनेक व्यवहार पंधरा वर्षापूर्वीचे मुदतबाहय असले तरी सद्या गैरअर्जदार क्र.१ यांचे नावांने तक्रारदार यांच्या आईने विक्री केलेल्या जमिनीपैकी रेल शिवारातील गट नं.२२६ मधील ४० आर जमीन गैरअर्जदार क्र.१ यांचे नावांवर असुन सदर जमिनीचा ताबा अर्जदार यांचे कडे आसल्याचे आढळुन आल्यामुळे सदर जमीन मुळ विक्रीदार मयत रमनबाई शेषराव मगर यांचे कायदेशिर वारस यांच्या नावाने परत करणे ही बाब जमिनीचा प्रत्यक्ष ताबा आर्जदाराकडे असल्यामुळे त्यांचे बाजुने व कालमर्यादेत आहे. अर्जदार यांचे आईने विक्री केलेली शेत जमीन मौजे रेल गट क्र.२२६ मधील २ हे.७४ आर जमिनीपैकी २.३४ दि.५.४.१९९७ ला खरेदीखताने आर्जदारांना परत केली आहे म्हणुन सदर खरेदीखत सावकारीच्या ओघात

प्रतिभुती म्हणुन दिली असल्याची माझी खात्री झाली आहे.त्यामुळे सदर खरेदी खतामधील उर्वरीत जमीन परत करणे करीता पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

मी, एन.व्ही.आघाव सावकारांचे निबंधक तथा जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था औरंगाबाद, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन गैरअर्जदार १ सौ. सुरजाबाई पुनमचंद अग्रवाल रा.टिळकनगर कन्नड यांना दिनांक १.३.१९८९ रोजी करुन दिलेले खरेदी खतापैकी २ हे.३४ आर दिनांक ५.४.१९९७ ला परत केली असुन, मुळ खरेदी खतामधील उर्वरीत परत करणे बाकी राहिलेली ४० आर जमीनीचे खरेदीखत रद्य करुन सदर शेतजमीन ही महाराष्ट्र सावकारी (नियमन ) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये मुळ मालक श्रीमती रमनबाई शेषराव मगर (मयत) यांच्या कायदेशिर वारसदारांना परत करणे बाबत आदेशित करीत आहे.

सदर आदेश आज दिनांक ०१/१२/२०१४ रोजी माझी सही व कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत केला आहे.

(एन.व्ही.आघाव)<br>
सावकारांचे जिल्हा निबंधक<br>
तथा जिल्हा उपनिबंधक<br>
सहकारी संस्था औरंगाबाद

O/C

**प्रत -**

१.मा. उप विभागीय अधिकारी कन्नड यांना पुढील कार्यवाहीस्तव माहितीस्तव.<br>
२.मा. तहसिलदार कन्नड यांना योग्य त्या पुढील कार्यवाहीस्त देण्यात येते.<br>
३.तलाठी सजा नावडी ता. कन्नड यांना देऊन कळविण्यात येते की,उक्त प्रकरणात योग्य ती कार्यवाही करावी.<br>
४. सहाय्यक निबंधक ,सहकारी संस्था, कन्नड यांना त्यांचा चौकशी अहवाल दि.१८/७/२०१४ च्या संदर्भात

**प्रत माहितीस्तव सविाय सादर.-**

१.मा.सहकार आयुक्त व निबंधक ,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे<br>
२.मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद

सावकारांचे जिल्हा निबंधक<br>
तथा जिल्हा उपनिबंध<br>
सहकारी संस्था औरंगाबाद

O/C